## बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते

क्र. एचओ /३५४९५ /प दि. 23 JAN 2013

### परिपत्रक

विषय : खाद्यपदार्थ हाताळणाऱ्या कामगारांची वैद्यकिय तपासणी करणे.
संदर्भ : १) परिपत्रक क्र.एचओ/८३३५/प. दि.७.०६.२०१२
२) कार्यालयीन आदेश क्र.एचओ/१९४२३/प. दि.१.९.२०१२

खाद्यपदार्थ हाताळणाऱ्या कामगारांची वैद्यकिय तपासणी वर्षातून एकदा करुन घेण्याबाबत दि.७.०६.२०१२ रोजी परिपत्रक क्र.एचओ/८३३५/प. अन्वये सर्व वैद्यकिय आरोग्य अधिकारी ए ते टी विभाग यांना सूचना देण्यात आल्या होत्या.

अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा १९५४ निरसित झाल्यानंतर अंमलात आलेल्या अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ ची अंमलबजावणी मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत नसल्यामूळे वरीष्ठ अन्न निरीक्षक व अन्न निरीक्षक यांची अति. आयुक्त (प.उ.) यांच्या दि.१३.०८.२०१२ चे आदेश क्र. अतिआ/पउ/एच/२५७ अन्वये खाद्यपदार्थ हाताळणाऱ्या कामगारांची वैद्यकिय तपासणी या योजने अंतर्गत नेमणूक करण्यात आली असुन प्रत्येकाने दररोज (सोमवार ते शुक्रवार) २० कामगार वैद्यकिय तपासणीसाठी संबंधित रुग्णालयात पाठविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सध्या असे निदर्शनास येते की, संदर्भाधिन परिपत्रकानुसार (एचओ/८३३५/प. दि.७.०६.२०१२) विभागीय स्वच्छता निरीक्षकांमार्फत खाद्यपदार्थ हाताळणाऱ्या कामगारांना संबंधित रुग्णालयात वैद्यकिय तपासणीसाठी पाठविले जात आहेत, तसेच वरीष्ठ अन्न निरीक्षक व अन्न निरीक्षक यांच्या मार्फत सुध्दा खाद्यपदार्थ हाताळणाऱ्या कामगारांना संबंधित रुग्णालयात वैद्यकिय तपासणीसाठी पाठविले जात आहेत. त्यामूळे संबंधित रुग्णालयांमध्ये एकाच दिवशी प्रमाणापेक्षा जास्त खाद्यपदार्थ हाताळणारे कामगार वैद्यकिय तपासणीसाठी उपस्थित होत आहेत. अशा परिस्थितीत जास्तीच्या कामगारांना वैद्यकिय तपासणी न होता परत पाठविले जात आहेत. संबंधित व्यावसायिकास त्याच्या आस्थापनेवरील खाद्यपदार्थ हाताळणाऱ्या कामगारांना वैद्यकिय तपासणीसाठी वारंवार पाठविणे शक्य नसल्यामूळे खाद्यपदार्थ हाताळणाऱ्या कामगारांची वैद्यकिय तपासणी करणे या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये विभागीय स्वच्छता निरीक्षक आणि वरीष्ठ अन्न निरीक्षक व अन्न निरीक्षक यांच्यात समन्वय असणे आवश्यक आहे.

वरीष्ठ निरीक्षक व अन्न निरीक्षक यांना अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणांव्यतिरीक्त खाद्यपदार्थ हाताळणाऱ्या कामगारांची वैद्यकिय तपासणी करणे हे एकमेव काम असल्यामूळे पुढील आदेश मिळेपर्यंत वैद्यकिय आरोग्य अधिकारी ए ते टी विभागाच्या स्वच्छता निरीक्षकांमार्फत खाद्यपदार्थ हाताळणाऱ्या कामगारांना वैद्यकिय तपासणी करीता पाठविण्यात येऊ नये असे आदेश याद्वारे देण्यात येत आहेत. हे परिपत्रक प्राप्त

होण्यापूर्वी ज्या स्वच्छता निरीक्षकांनी खाद्यपदार्थ हाताळणाऱ्या कामगारांना वैद्यकिय तपासणीसाठी नोटीस दिले असतील, त्याची माहिती संबंधित वरीष्ठ अन्न निरीक्षक किंवा अन्न निरीक्षकांना त्वरीत देण्यात यावी. तसेच, त्यांच्या क्षेत्रीय तपासणीमध्ये ज्या आस्थापनेमधील खाद्यपदार्थ हाताळणाऱ्या कामगारांची वैद्यकिय तपासणी न झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याची माहिती संबंधीत वरीष्ठ अन्न निरीक्षक किंवा अन्न निरीक्षकांना देण्यात यावी.

उपरोक्त आदेश दि.१४.०१.२०१३ पासून अंमलात येत आहेत.

सही/-

कार्यकारी आरोग्य अधिकारी

एचओ/ 35415/ प दि. 23 JAN 2013

प्रत : सर्व वरिष्ठ अन्ननिरीक्षक / अन्ननिरीक्षक यांना माहिती व त्वरीत कार्यवाहीसाठी अग्रेषित

प्रत : वैद्यकीय आरोग्य अधिकारी (ए ते टी विभाग) यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

प्रत : सह कार्यकारी आरोग्य अधिकारी, उप.कार्यकारी आरोग्य अधिकारी, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत : संचालक (वै.शि. व प्र.रु.), अधिष्ठात्री - सायन रुग्णालय, अधिष्ठाता - नायर रुग्णालय यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

प्रत : प्रमुख वैद्यकीय अधिक्षका व माध्यमिक आरोग्य सेवा, यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत : प्रमुख वैद्यकीय अधिक्षक (विशेष रुग्णालये) यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत : वैद्यकीय अधिक्षक - कुपर, बांद्रा भाभा, व्हि.एन. देसाई, भगवती, एम.टी. अगरवाल, राजावाडी, कुर्ला भाभा यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

11/1/13

उपका. आ. अधिकारी (मुख्यालय) | कार्यकारी आरोग्य अधिकारी

No. DIR. (ME & MH) 2693

Date: 26.9.93

संचालक (वै.शि.व.प्र.रु.)
रा.ए. स्मा. रुग्णालय

2...

2693

आवक क्रमांक:
दिनांक :
वेळ:

PA| AO E/C NHDC
Fax to all Deans
SAO, implement at NHDC
27/1/13

Director (M.E.&M.H.)

F:\Corres\Corres 3\Circular-Food handlers.doc